Plc

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७

ई-मेल—desk१८@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

संकेतस्थळ /रजिस्टर एडी/ई-मेल द्वारे

क्र.१८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/२०२२-२३/ २०७
दिनांक : ०५/ ०८ / २०२२

प्रति,
सर्व संबंधित संस्थांचे प्राचार्य / संचालक,
( अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त व्यावसायिक पदविका / पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था )
महाराष्ट्र राज्य.

विषय :- **अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या प्रगती , सक्षम व स्वनाथ शिष्यवृत्ती योजनांची सन २०२२-२३ साठीच्या अंमलबजावणीबाबत....**

संदर्भ : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र File No. ४९-१/५०-१ AICTE/StDC/ Pragati & Saksham/२०२२-२३ -दि. १९.०७.२०२२

उपरोक्त विषयांकीत संदर्भीय पत्रान्वये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त व्यावसायिक पदविका / पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व संबंधित संस्थांचे प्राचार्य / संचालक यांना कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या **प्रगती , सक्षम व स्वनाथ शिष्यवृत्ती योजनांच्या** महाराष्ट्र राज्यामधील अंमलबजावणीकरिता **तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई** यांना नोडल ऑफिस म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. सदर तिन्ही योजनांची माहिती खालीलप्रमाणे,

## अ) प्रगती शिष्यवृत्ती योजना ::

[ AICTE-Pragati Scholarship Scheme for Students (Degree / Diploma)]

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची मंजूरी असलेल्या संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये (पदविका, पदवी) शिकणाऱ्या **विद्यार्थीनीं साठी** प्रगती शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित ) रुपये ८.०० लाखापर्यंत** असावे व एका कुटूंबातील **केवळ दोन मुलींना** सदर योजना लागू राहील.

सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी केंद्र शासनाकडून खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीचा नविन संच **तसेच** नविन व नूतनीकरणाच्या शिष्यवृत्तीसाठी आलेल्या पात्र व मंजूर विद्यार्थ्यांला शिष्यवृत्तीची रक्कम खालील प्रमाणे निर्धारित करण्यात आलेली आहे.

- **नविन संच / कोटा ( Quota ) :-**

| राज्य | अ.क्र. | अभ्यासक्रम | संच संख्या |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १ | पदविका | ६२४ |
| | २ | पदवी | ५५३ |

- **शिष्यवृत्ती रक्कम :-**

| अ.क्र. | शिष्यवृत्तीचे घटक | एक रक्कम ( Lump sum Amount ) |
|---|---|---|
| अ | संस्थेला देय असणारे शुल्क, संगणक, स्टेशनरी, पुस्तके, यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर खरेदी इ. | **रु. ५०,०००/- प्रति वर्ष** |

## ब ) सक्षम शिष्यवृत्ती योजना ::

[ AICTE-Saksham Scholarship Scheme for Students (Degree / Diploma)]

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मंजूरी प्राप्त संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये ( पदविका, पदवी ) शिकणाऱ्या **विशेष दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी** सक्षम शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित ) रुपये ८.०० लाखापर्यंत** व **दिव्यांगाचे प्रमाण ४०% किंवा त्यापेक्षा अधिक** असावे असे निश्चित करण्यात आलेले आहे.

सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी केंद्र शासनाकडून खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीचा नविन संच **तसेच** नविन व नूतनीकरणाच्या शिष्यवृत्तीसाठी आलेल्या पात्र व मंजूर विद्यार्थ्यांला शिष्यवृत्तीची रक्कम खालील प्रमाणे निर्धारित करण्यात आलेली आहे.

- **नविन संच / कोटा ( Quota ) :-**

| राज्य | अ.क्र. | अभ्यासक्रम | संच संख्या |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १ | पदविका | सर्व पात्र |
| | २ | पदवी | सर्व पात्र |

- **शिष्यवृत्ती रक्कम :-**

| अ.क्र. | शिष्यवृत्तीचे घटक | एक रक्कम ( Lump sum Amount ) |
|---|---|---|
| ब | संस्थेला देय असणारे शुल्क, संगणक, स्टेशनरी, पुस्तके, यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर खरेदी इ. | **रु. ५०,०००/- प्रति वर्ष** |

## क ) स्वनाथ शिष्यवृत्ती योजना :

[ AICTE-Swanath Scholarship Scheme for Students (Degree / Diploma)]

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद्रेची मंजूरी असलेल्या संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये (पदविका,पदवी) शिकणाऱ्या **अनाथ किंवा ज्या विद्यार्थ्याचे आई वडील दोघेही किंवा दोघांपैकी एक कोव्हिड-१९ ने मृत्यू पावले आहेत किंवा ज्या विद्यार्थ्यांचे पालक सशस्त्र दल आणि केंद्रीय निमलष्करी दलांच्या कारवाईमध्ये शहीद झाले आहेत** अशा विद्यार्थ्यांसाठी **स्वनाथ शिष्यवृत्ती** योजना सुरू केलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे सर्व स्त्रोतांमार्फत मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये ८ लाखापर्यंत** निश्चित करण्यात आलेले आहे.

सदर योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून संपूर्ण देशासाठी खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीचा नविन संच **तसेच** नविन व नूतनीकरणाच्या शिष्यवृत्तीसाठी आलेल्या पात्र व मंजूर विद्यार्थ्यांला शिष्यवृत्तीची रक्कम खालील प्रमाणे निर्धारित करण्यात आलेली आहे.

- नविन संच/कोटा (Quota)

| अ क्र. | अभ्यासक्रम | संपूर्ण देशासाठी संच संख्या |
|---|---|---|
| १ | पदविका | १००० |
| २ | पदवी | १००० |

- **शिष्यवृत्ती रक्कम**

| **अ.क्र.** | **शिष्यवृत्तीचे घटक** | **एक रक्कम ( Lump sum Amount )** |
|---|---|---|
| अ | संस्थेला देय असणारे शुल्क, संगणक, स्टेशनरी, पुस्तके, यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर खरेदी इ. | **रु.५०,०००/- प्रति वर्ष** |

उपरोक्त तिन्ही योजनेची सविस्तर माहिती केंद्र शासनाच्या अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे संकेतस्थळावर ( संकेतस्थळ - www.aicte-india.org ) / केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टल (संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) वर देण्यात आलेली आहे

सदर योजनेची मंजुर रक्कम केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये Direct Benefit Transfer ( DBT ) अंतर्गत जमा करण्यात येईल.

सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) ऑनलाईनरित्या राबविण्यात येतात. **सन २०२२-२३ करिता** सदर योजनेच्या लाभासाठी **,सन २०२२-२३ मध्ये प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्षात नव्याने प्रवेशित** विद्यार्थ्यांनी **नवीन** ( Fresh ) अर्ज व **सन २०२१-२२ मध्ये शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या पात्र** विद्यार्थ्यांनी **नूतनीकरण** ( Renewal ) अर्ज NSP पोर्टलवर खालीलप्रमाणे जाहीर करण्यात आलेल्या अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईनरित्या करावे ( अर्ज करण्यापूर्वी मार्गदर्शनासाठी विद्यार्थ्यांनी NSP पोर्टलवर सदर योजनेसाठी उपलब्ध User Manual / Guideline/FAQ चा वापर करावा.)

तसेच, संस्थांनी NSP पोर्टलच्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन प्राप्त झालेले अर्ज प्रलंबित न ठेवता पोर्टलवर नमूद अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईनरित्या तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करावी.

| **विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याचे व संस्थेने अर्ज तपासणीचे वेळापत्रक :: शै. वर्ष २०२२-२३** | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **कार्यवाही** | **अंतिम दिनांक** |
| १ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरणे. | ३१ ऑक्टोबर, २०२२ |
| २ | संस्थांनी ऑनलाईन अर्जांची तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करणे | १५ नोव्हेंबर, २०२२ |
| **टीप :: केंद्र शासनाकडून वेळापत्रकात काही बदल झाल्यास सदर बदल एनएसपी पोर्टलवर ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) जाहिर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.** | | |

महत्त्वाची सूचना-

१. संस्थांनी एनएसपी पोर्टलवरील संबंधित योजनांसाठी असलेल्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन Institute Profile अद्ययावत करावी.

२. संस्थांनी उपरोक्त योजनेबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावावी व योजनेसाठी पात्र असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना योजनांबाबतची माहिती निदर्शनास आणून द्यावी जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही.

३. विद्यार्थी केंद्र शासनाच्या ( NSP Portal ) व महाराष्ट्र शासनाच्या ( DBT Portal ) पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल याबाबत संस्था प्रमुखांनी स्वत: योग्य ती दक्षता घ्यावी.

४. संस्थेच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले अर्ज जर तपासणीच्या अंतिम मुदतीनंतर संस्था स्तरावर तपासणीसाठी प्रलंबित राहील्यास किंवा

५. विद्यार्थ्याने एकाच वर्षाकरिता दोन - दोन शिष्यवृत्ती योजनांचा ( केंद्र व राज्य शासनाच्या अशा दोन्ही शिष्यवृत्ती योजनांचा ) लाभ प्राप्त करुन घेतल्यास किंवा

६. संस्थेमध्ये शिकत नसलेल्या विद्यार्थ्याच्या शिष्यवृत्ती अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्यास किंवा

७. संस्थेमध्ये TFWS अंतर्गत प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्याच्या शिष्यवृत्ती अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्यास तर याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

( डॉ. अभय वाघ. )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई.

---

पृष्ठांकन क्र. विकाऔ/शिक्षण/२०२२/ ३००८
दिनांक:- 11 AUG 2022

या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांना सन २०२२-२३ साठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या प्रगती, सक्षम व स्वनाथ शिष्यवृत्ती योजनांची उपरोक्त पत्रात नमूद माहिती व वेळापत्रकानूसार कार्यवाही पूर्ण करण्याची सूचना आपल्या संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाही अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(उमेश नागदेवे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- १. मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
२. या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.